**तरि श्रावण नयन |त्वचा घ्राण रसन |हीच जाण पाच |ज्ञानेंद्रिये ||९८|१३|ज्ञा.**

शरीराचा गोळा तयार असेलही पण त्याचे अस्तित्व किंवा असणे आसमंत न्याहळल्या शिवाय खऱ्या अर्थाने पूर्ण होत नाही. जगण्याचा तो एक महत्वाचा भाग आहे. हे न्याहाळणे पांच ज्ञानेंद्रियांकडून होते. त्यात ऐकणे (श्रवण) बघणे (नयन) स्पर्श (त्वचा) वास घेणे (घ्राण) आणि चव घेणे म्हणजे रसन (जीभ) ही दहा मंडळी अंतर्भूत आहे. पाच इंद्रिये आणि त्यांचे पाच प्रकारचे वैशिष्ट्यपूर्ण आकलन मिळून दहा होतात. ह्यातली चार इंद्रिये मेंदूच्या आसपास वस्ती करून आहेत कारण मेंदूमध्ये आकलन शक्ती आहे. ती दूरवर ठून रस्ता फार लांब झाला असता. आपल्या पूर्वीच्या वाङ्मयात डोळ्याला चर्मचक्षु म्हटले आहे. कारण तो एक कॅमेरा आहे. त्या कॅमेऱ्यातल्या प्रतिमा मेंदू टिपतो आणि त्याच्यातल्या रासायनिक आणि विद्युत प्रवाहांच्या सहाय्याने आपण म्हणतो की मला काहीतरी दिसते आहे. ब्रह्मापासून आपल्या शरीरात निर्माण झालेल्या ह्या चैतन्याच्या कालव्यांना “डोळ्याचा डोळा” असे नामकरण करण्यात आले आहे. म्हणूनच ज्ञानेंद्रिये मेंदूची उपांगे आहेत. आसमंताचा मागोवा घेतल्यानंतर प्रतिक्रिया उमटतात. त्याचे कारण इच्छा असते. आसमंतातल्या गोष्टींचे ज्ञान झाल्यावर त्या गोष्टी मिळाव्यात असे इच्छा म्हणते. परंतु नुसते म्हणून चालत नाही काही मिळवायचे असेल तर हालचाल करावी लागते त्या हालचाली साठी इंद्रिये लागतात ती कर्मेंद्रिये. तीही पाच असतात. ज्ञानेंद्रिये जशी मेंदूला चिकटून त्या मेंदूची उपांगे होतात. तसे कर्मेंद्रियांचे नसते कारण क्रिया करणारी इंद्रिये शरीराला हलवणार असतील तर ती शरीराच्या जवळ लागतात. मेंदू जवळ नव्हे. त्याची ओवी पुढीलप्रमाणे.

मग वाचा आणि कर |चरण अधोद्वार |अपायु हे प्रकार |आणखीन पाच १००|१३|ज्ञा.

वाचा (जीभ) कर (देवाण घेवाण) चरण (चालणे, उभे राहणे) अधोद्वार|गुदद्वार मल मूत्र विसर्जन) अपायु (शिस्न, योनी, जननक्रिया) अशी पाच इंद्रिये आणि त्यांची कार्ये मिळून दहा होतात. आता गडी तयार झाला खरा पण त्या गड्याची चावी अहंकार फिरवतो आणि एखादा यंत्रमानव(रोबो) हातपाय हलवत चालू लागावा त्याप्रमाणे दृष्य दिसते. अर्थात हे यंत्र नसते कारण ह्या हालचालीत जे मिळते किंवा मिळत नाही त्याचे परिणाम होतात. रोबो बिघडू शकतो, थांबवता येतो परंतु तो नाराज होत नाही किंवा त्याला आनंदाच्या उकळ्या फुटत नाहीत. त्याबद्दल पुढच्या प्रकरणात. मागच्या प्रकरणात सहा आकडा झाला. इथे इच्छा आणि अहंकार धरून झाले एकूण २८.

३३० शब्द

**जे इंद्रिया आणि बुद्धी | माझारिलिये संधी | रजोगुणांच्या खांदी | तरळत असे ||१०४|१३|ज्ञा.**

मन कुठे आहे तर ते इंद्रिये आणि बुद्धी ह्यांच्या मध्यभागी जो सांधा आहे. त्यावर तरळते असे ही ओवी म्हणते. तरळते हा शब्द महत्वाचा कारण मन चळवळे असते असे इथे सुचवले आहे. दुसऱ्या चरणातला पाहिला भाग रजोगुणाची खांदी असा आहे. इथे खांदी म्हणजे फांदी. खांदा नव्हे. रजोगुणाचा उल्लेख इथे येतो खरा परंतु माणसातले तीन गुण कोठले आणि त्यांची वैशिष्ट्ये काय हे सांगणारा चौदावा अध्याय अजून सांगायचा आहे. गीतेमध्ये असे पुढे मागे प्रकार होत राहतात ह्याचे हे एक उदाहरण. शाळेमध्ये जसा पाठ्यक्रम असतो तसे इथे घडलेले नाही. दुसऱ्या तिसऱ्या अध्यायात ह्याही आधी माणूस त्याच्या गुणाप्रमाणे वागणे अपरिहार्य आहे असेही विधान आहे. अर्जुन बऱ्यापैकी समज असलेला एक भरपूर शिकलेला विद्यार्थी आहे म्हणून हे चालून जाते पण माझ्या सारख्या वाचकाला ते अवघड जाते. गुणांचे वर्णन करणारा चौदावा अध्याय आपण नंतर बघूच. ह्या ओवीतला फांदी हा शब्दही खटकतो. मनबुद्धीच्या सांध्यावर ही फांदी फुटली की काय अस विचार येतो परंतु ही फांदी पंधराव्या अध्यायातली आहे आणि ती फांदी एका वृक्षापासून फुटते आणि तिथे हा चळवळ्या रजोगुण फुटतो असे वर्णन आहे. हा वृक्ष विश्वाचे स्वरूप म्हणून पुढे सांगण्यात आला आहे. इथेही पुढे मागे आहेच असो. एखाद्या जगतमान्य ग्रंथावर अशा तऱ्हेने टीका.... विश्लेषण करणे म्हणजे जरा आगाऊपणाचा झाला. मूळ मुद्दा मन कोठे आहे हा आहे. एका बाजूला इंद्रिये आहेत ती त्यांच्या कुवतीप्रमाणे विश्वाची माहिती मनात आणून भरताहेत. पलीकडे बुद्धी बसली आहे ती ह्या माहितीचा न्याय निवाड करणार आहे असा हा प्रसंग आहे. निवाडा व्हायच्या आधी मन थोडे फार मूर्ख असल्यामुळे ते “मृगजलावर उमटलेल्या लाटा मोजते “आकाश स्वच्छ असते पण त्याला निळे म्हणते” अशा अर्थाच्या ओव्या सांगून ज्ञानेश्वर मनाचा फोलपणा दाखवतात. हे मन प्रेरणेचे मूळ असते म्हणून “आपला रथ ते गावभर फिरवते (मनोरथ) आणि “ हिरवा चारा दिसला की पशु जसा अधीर होतो” त्यात जी इच्छा वासना दडलेली असते ती मनाचे उत्पादन असते. मग हे अहंकाराला बळी पडते ते वाऱ्यासारखे भिरभिरते आणि मग हे मन ह्या करामतींमुळे जीवाला जन्माला घालते असे वर्णन ज्ञानेश्वर करतात. मन आणि बुद्धी ही तत्वे आता अवतरली एकूण तत्वे आता झाली तीस. बुद्धी बद्दल पुढच्या प्रकरणात.

३३९ शब्द